लोकसहभागातून ग्रामपंचायतींचा विकास : मित्तल

राष्ट्रीय पंचायतराजदिनी ग्रामपंचायतींचा सन्मान

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रीय पंचायत राज दिवस प्रत्येक ग्रामपंचायतीने व ग्रामविकासातील प्रत्येक घटकाने उत्साहात साजरा करायला हवा. महात्मा गांधी यांनी खरा भारत हा ग्रामीण भागात वसतो, असे सांगितले होते, त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाल्यास भारताचा विकास होईल. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाने ग्रामपंचायतीने दिलेल्या अधिकारांचा सकारात्मक वापर केल्यास लोकसहभागातून प्रत्येक ग्रामपंचायतीचा विकास होईल, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

ग्रामीण लोकशाहीचा पाया असलेल्या पंचायती राज व्यवस्थेच्या सन्मानार्थ राष्ट्रीय पंचायतराज दिवस जिल्हा परिषदेत उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी मित्तल बोलत होत्या.

राष्ट्रीय पंचायत राज पुरस्कारासाठी संपूर्ण राज्यातून नाशिक जिल्ह्यातील सय्यद पिंप्री ग्रामपंचायतीची निवड झाली होती. मोडाळे ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केली असून अंदसूल ग्रामपंचायतीने ई गव्हर्नन्स प्रकारात चांगले काम केले असल्याने या तिन्ही ग्रामपंचायतीचे सन्माननीय सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान करतांना आनंद होत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशानुसार दरवर्षी २४ एप्रिल रोजी राष्ट्रीय पंचायतराज दिवस साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी 'पंचायत, सशक्त लोकशाहीचा पाया' ही संकल्पना अधोरेखित करत, नाशिक जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक जिल्हा परिषदेत पंचायत राज दिनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे यांचे राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त बिहार प्रसारित होणारे विशेष संदेशाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्याचबरोबर सेवा हक्क कायदा जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमात ग्रामपंचायत पिंप्री सैय्यद (ता. व जि. नाशिक), ग्रामपंचायत मोडाळे (ता. इगतपुरी), व ग्रामपंचायत अंदरसूल (ता. येवला) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या ग्रामविकास व पंचायतराज सक्षमीकरणातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, सहायक गट विकास अधिकारी प्रशांत पवार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मंगेश चव्हाण यांच्यासह सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सन्मानित सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी:

ग्रामपंचायत पिंप्री सैय्यद सरपंच भाऊसाहेब ढिकले व ग्रामपंचायत अधिकारी दौलत गांगुर्डे

ग्रामपंचायत मोडाळे सरपंच शिल्पा आहेर व ग्रामपंचायत अधिकारी हनुमान दराडे

ग्रामपंचायत अंदरसूल उपसरपंच रवींद्र वाकचौरे व ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब बोराडे

सह्याद्री हॉस्पिटलमध्ये रुग्णावर यशस्वी मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी

नाशिक । वैद्यकीय उपचारांमध्ये वेळेवर उपचार मिळणे अत्यंत महत्वाचे असतात. अशाच एका ८२ वर्षीय रुग्णाला स्ट्रोक आला असता सह्याद्री हॉस्पिटलमध्ये त्वरित उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहे.

हॉस्पिटलमधील निष्णात इंटरव्हेंशनल न्यूरोलॉजिस्ट आणि स्ट्रोक स्पेशालिस्ट डॉ. श्रीपाल शाह यांच्या नेतृत्वाखालील वैद्यकीय पथकाने प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले. त्यामुळे स्ट्रोकमधून बरे होण्यासाठी आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे.

१६ तासांनंतर रुग्णालयात दाखल झाल्यानंतर वैद्यकीय पथकाने प्रसंगावधान राखून रुग्णावर तातडीची शस्त्रक्रिया केली. या वेळेत झालेल्या उपचारामुळे रुग्णामध्ये उल्लेखनीय सुधारणा दिसून आल्या. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या तीन दिवसांत रुग्ण पुन्हा बोलायला व चालायला लागला. त्यानंतर त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

रुग्णावर यशस्वीपणे करण्यात आलेल्या 'मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी' या प्रक्रियेचे महत्त्व डॉ. शाह यांनी स्पष्ट केले. ही शस्त्रक्रिया स्ट्रोक

आल्यानंतर पहिल्या ६ तासांत केली जाते, मात्र या विशिष्ट प्रकरणात ही शस्त्रक्रिया २४ तासांत करण्यात आली. हे 'क्लिनिकल रेडिओलॉजिकल मिसमॅच' या कारणामुळे शक्य झाले. सह्याद्रि हॉस्पिटल स्ट्रोकवरील तातडीच्या उपचारांसाठी प्रसिद्ध असून, ॲडव्हान्स स्ट्रोक सेंटरमध्ये अनुभवी डॉक्टर्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान व कॅथलॅब सुविधेमुळे आणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठी सह्याद्री रुग्णालय पूर्णपणे सक्षम असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

क्रेडाई नाशिक मेट्रो नूतन कार्यकारिणीचा धोरणात्मक आराखडा

नाशिक । बांधकाम व्यावसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था असलेल्या क्रेडाई नाशिक मेट्रोच्या २०२५-२७ साठीच्या नूतन कार्यकारिणीने अध्यक्ष गौरव ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली नुकताच पदभार स्वीकारला. येत्या २ वर्षांतील नियोजनाचा आराखडा त्यांनी सादर केला.

यानुसार आगामी दोन वर्षांत इम्पॅक्ट या सहा सूत्रांवर काम करणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. इनोव्हेशन (नावीन्य), मेंटरशीप (मार्गदर्शन), पार्टनरशिप (भागीदारी), अकाऊंटेबिलिटी (उत्तरदायित्व), कम्युनिटी (सामाजिक बांधिलकी) आणि ट्रान्सफॉर्मेशन (बदल) अशी सहा सूत्रे आहेत. स्थानिकांच्या सहकार्याने नाशिकच्या सांस्कृतिक वैभवाची जपणूक, बांधकाम व्यवसायासंबंधी प्रशिक्षण कार्यक्रम, महिला व मुलांच्या सक्षमीकरणासाठी प्रकल्प राबविणे,वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, विकासकांकडून पायाभूत सुविधांसाठी योगदान, कामगार वर्गासाठी आरोग्य अभियान, पखवडाऱ्या घरांना प्राधान्य, आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये २५ कोटी भाविक येण्यासाठी मार्केटिंग व संबंधितांना सहकार्य तसेच नाशिक हेरिटेज पार्क होण्यासाठी पुढाकार आणि पाठपुरावा क्रेडाई नाशिकच्या वतीने करण्यात येणार आहे.

CREDAI
NASHIK METRO

कार्यकारिणी

अध्यक्ष गौरव ठक्कर, मानद सचिव तुषार संकलेचा, माजी अध्यक्ष कृणाल पाटील, उपाध्यक्ष अनिल आहेर, मनोज खिवंसरा, अंजन भालोदिया, उदय घुगे, कोषाध्यक्ष श्रीनिक सुराणा, सहसचिव सचिन बागड, नरेंद्र कुलकर्णी, ऋषिकेश कोते, हंसराज देशमुख, तसेच समिती सदस्य म्हणून श्यामकुमार साबळे, अनंत ठाकरे, विजय चव्हाणके, सागर शाह, निशित अटल, सुशील बागड, निरंजन शाह, वृषाली हिरे, दीपाली बिरारी यांचा तर सहयोगी सदस्य सतीश मोरे, सुशांत गांगुर्डे, अभिषेक महाजन, समीर सोनवणे यांचा समावेश आहे.

आमंत्रित सदस्य-मनोज लाडानी,हर्षल हणमंते,भूषण कोठावदे, शिवम पटेल, हिरेन भडजा, मयूरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल याची निवड करण्यात आलेली आहे. क्रेडाई युवा विंग समन्वयक आदित्य भातंबरेकर सह समन्वयक अजिंक्य नहार यांची निवड केली असून त्यांची १५ जणांची टीम तयार करण्यात आलेली असल्याची घोषणा नूतन अध्यक्ष गौरव ठक्कर यांनी केली.

२५ वर्षांनंतर दस्तऐवज हाताळणी शुल्क प्रतीपान ४० रूपये

नाशिक । प्रतिनिधी

२५ वर्षांनंतर दस्तऐवज हाताळणी शुल्क प्रती पान २० रूपये वरून ४० रूपये इतके करण्यात आले आहे.

सन २००१ मध्ये २० रुपये हाताळणी शुल्क होते. त्यानंतर कागदाच्या किमती वाढल्या. सॉफ्टवेअर ऑपरेटिंग, नवीन सॉफ्टवेअर महाग झाले. त्यामुळे संबंधीत कंपन्यानी सातत्याने दरवाढ करण्याची मागणी केली होती. कारण त्यातील दहा रुपये कंपनीला व दहा रुपये शासनाला मिळत होते. आता शासनाला वीस व कंपन्यांना २० रुपये मिळतील. अर्थात हा सारा भार नव्याने स्थावर मालमत्ता खरेदी करणाऱ्यांनाच सहन करावा लागणार आहे. अगोदरच बांधकामाचे दर वाढले आहेत. त्यानंतर मुद्रांक शुल्कही दहा टक्के वधारले आहे. त्यात आता हाताळणी शुल्कापोटी प्रत्येक पाना मागे २० रुपये जादा द्यावे लागत आहेत. नाशिक बार असोसिएशनने याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. नोंदणी प्रक्रिया संगणकीकृत झालेली असली तरी आजही सर्व्हर समस्या कायम आहेत. सुविधा अपुऱ्या आहेत. त्या सुधारण्याऐवजी नागरिकांवर आर्थिक भार टाकल्याने नाराजी व्यक्त होत आहे. नोंदणी व मुद्रांक विभाग हा सर्वाधिक महसूल मिळवून देतो. तरीदेखील मॅन्युअल नोंदणीच्या काळात ५रू.,संगणकीकरणानंतर २० रू.शुल्क आकारले गेले. आता कोणतीही सेवा सुधारणा न करता शुल्क दुप्पट केले आहे.

१ एप्रिलपासून मालमत्तेच्या रेडीरकनरमध्ये ७ ते १० टक्के वाढ केली. काही दस्तांवरील मुद्रांक शुल्क १०० वरून ५०० रूपयांपर्यंत वाढवले गेले, यामुळे नागरिक व वकिलांवर आर्थिक ताण वाढला आहे.

त्यामुळे महाराष्ट्र व गोवा वकील परिषद या राज्यस्तरीय संघटनेमार्फत लवकरच राज्यव्यापी निषेध मोहीम राबवली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

'आरईसी' सीएमडीपदी जितेंद्र श्रीवास्तव

गुडगाव । आयएएस जितेंद्र श्रीवास्तव यांनी आरईसी लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) म्हणून नुकताच पदभार स्वीकारला. कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने बिहार कॅडरचे आयएएस अधिकारी श्रीवास्तव यांची नियुक्ती केली. ही नियुक्ती ऊर्जा मंत्रालयाच्या अंतर्गत भारत सरकारच्या अतिरिक्त सचिव पदावर करण्यात आली आहे. दोन दशकांहून अधिक काळ श्रीवास्तव यांनी सेवा दिली आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी केंद्र व बिहार सरकारमध्ये अनेक महत्त्वाच्या प्रशासकीय भूमिका बजावल्या आहेत.

ग्रामीण गृहनिर्माण योजनेत जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्याने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत राज्य शासनाने निश्चित १०० दिवस कार्यक्रमातील निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पार्श्वभूमीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्याने १३ हजार ५४३ घरकुलांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत तब्बल १६ हजार ९६० घरकुले पूर्ण करून १२५ टक्के पूर्तता साधली आहे. ही कामगिरी राज्यस्तरीय घरकुल पूर्णतेच्या मोहिमेमध्ये अव्वल ठरली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसीय विशेष कार्यक्रमांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी महत्वाकांक्षी उद्दिष्टे जाहीर करण्यात आली होती. या अनुषंगाने नाशिक जिल्ह्याने केवळ उद्दिष्टे पूर्ण केली नाहीत, तर त्यापेक्षा अधिक कामगिरी करून ग्रामीण भागातील असंख्य कुटुंबांना त्यांच्या स्वप्नातील हक्काचे घर उपलब्ध करून दिले आहे. ही कामगिरी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद नाशिक यांच्या प्रभावी नेतृत्व आणि संघटित प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. या यशाबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील सर्व घटकांचे शासन स्तरावरून विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे यांनी दिली.

नाशिक जिल्ह्याच्या सर्व विकास अधिकाऱ्यांनी, गटविकास अधिकाऱ्यांनी आणि ग्रामपंचायतींनी ग्रामीण भागातील गरजू नागरिकांपर्यंत घरकुल योजना प्रभावीपणे पोहोचवली असून संपूर्ण जिल्हा प्रशासनाच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित हे आहे.

आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक

पान १ वरून...

अवमान केल्याप्रकरणी मेधा पाटकर यांना अटक

यांनी मेधा पाटकर यांना कोर्टात हजर न राहणे आणि जाणुनबुजून शिक्षेशी निगडीत आदेशाचे पालन न करणे असा ठपका ठेवला. कोर्टाचा अवमान करून सुनावणीपासून पळ काढण्याचा हा त्यांचा हेतू होता. त्यामुळे पाटकरांना कोर्टासमोर हजर करणे गरजेचे आहे असे त्यांनी म्हटले होते. पाटकरांना २३ वर्षे जुन्या प्रकरणात शिक्षा सुनावण्यात आली. पण त्यांच वय आणि आरोग्य लक्षात घेता त्यांना तुरुंगवासाच्या शिक्षेतून सूट देण्यात आली. पण नुकसानभरपाई आणि बॉन्ड भरण्याचे आदेश दिले गेले होते.

धार्मिक अधिकारांमध्ये कोणताही हस्तक्षेप नाही

कोणता कायदा वैध वाटत नसेल, तर संपूर्ण कायदाच रद्द करावा लागेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने असेही सांगितले की, वक्फ ही मुस्लिमांची धार्मिक संस्था नसून एक वैधानिक संस्था आहे आणि वक्फ सुधारणा कायद्यात विश्वस्त भूमिका धर्मनिरपेक्ष स्वरूपाची आहे. त्यामुळे, या कायद्याचा उद्देश कोणत्याही विशिष्ट धर्माला लाभ देणे नाही, तर एक पारदर्शक आणि उत्तरदायित्व असलेली प्रशासन व्यवस्था निर्माण करणे आहे.

या कायद्याच्या तयारीदरम्यान संसदेने संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली होती. या समितीने एकूण ३६ बैठकांचे आयोजन केले आणि देशभरातील ९७ लाखांहून अधिक भागधारकांकडून सूचना व निवेदने प्राप्त केली. या प्रक्रियेमध्ये समितीने देशातील दहा प्रमुख शहरांना भेटी दिल्या आणि थेट जनतेशी संवाद साधून त्यांचे मत जाणून घेतले.

या विस्तृत सल्लामसलत प्रक्रियेनंतर आणि लोकप्रतिनिधींच्या चर्चेनंतरच कायदा तयार करण्यात आला आणि संसदेमध्ये बहुमताने तो मंजूर करण्यात आला. त्यामुळे, या कायद्याला जनतेच्या प्रतिनिधित्वाचा आधार असल्याचे केंद्र सरकारने ठासून सांगितले आहे.

राहुल गांधींना दिलासा अन् खडेबोल

खुद्द महात्मा गांधी यांनीही सावरकरांचा सन्मान केला आहे. एवढेच नाही तर, त्यांची आजी इंदिरा गांधी यांनीही त्यांना पत्र लिहिले होते. स्वातंत्र्यसैनिकांचा इतिहास समजून घेतल्याशिवाय आपण अशा प्रकारची विधाने करू शकत नाही.आपल्याला स्वातंत्र्य देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांबद्दल आपण असे कसे वागू शकता? यावेळी सावरकर आहेत, पुढच्या वेळी कुणी म्हणेल की, महात्मा गांधी इंग्रजांचे नोकर होते. भविष्यात अशा प्रकारचे विधान केले तर, आम्ही स्वतःहून त्याची दखल घेऊ आणि सुनावणी करू, असा इशाराही न्यायालयाने कॉंग्रेस खासदार राहुल गांधी यांना दिला.

शिर्डी विमानतळाचे विस्तारीकरण

महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गाने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करून आणि नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाचे विस्तारीकरणाच्या प्रस्तावास बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये दोन हेलिपॅड आणि आठ वाहनतळांचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्याच्या दरम्यान येणाऱ्या विमाने आणि हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. तसेच या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा, अशी सूचना देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिली.

लातूर विमानतळाचाही विकास

लातूर जिल्ह्याचा सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास आणि विस्तार होत आहे. त्यामुळे लातूर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी या विमानतळाचा विकास करण्यात यावा. हे विमानतळाचा लातूरसह बीड, धाराशिव या जिल्ह्यांनाही लाभ होईल. तसेच कराड येथील विमानतळाचे काम वेगाने सुरू करून तेथे नाईट लँडिंगची सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी बैठकीत दिले. चंद्रपूर येथील विमानतळावर चार्टर विमाने उतरू शकतील अशी सुविधा तयार करण्यासाठी तेथील धावपट्टी वाढविण्यात यावी. तसेच गडचिरोली येथील विमानतळासाठी दोन ते तीन पर्यायी जागांचा विचार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पाच सदस्यांची बिनविरोध निवड

सेक्रेटरी समीर रकटे, खजिनदारपदी हेमंत देशपांडे

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. अर्ज स्वीकृतीनंतर सचिवपदासह खजिनदार आणि तीन निवड समिती सदस्यांसाठी प्रत्येक जागेसाठी एकमेव अर्ज आल्याने पाच सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

एनडीसीए निवडणूक प्रक्रियेतील नामांकन पत्र वाटप, स्वीकृती व छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नामांकन अर्जाच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण २५ अर्ज दाखल झाले आहेत. यांत चेअरमन पदासाठी दोन, जॉइंट सेक्रेटरीपदासाठी तीन आणि १० कार्यकारिणी पदांसाठी १५ नामांकन अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान सेक्रेटरी, खजिनदार व तीन निवड समिती सदस्य पदासाठी प्रत्येकी एक अर्ज प्राप्त झाल्यामुळे सेक्रेटरी समीर रकटे, खजिनदार हेमंत देशपांडे आणि निवड समिती सदस्य म्हणून सतीश गायकवाड, तरुण गुप्ता, फय्याज गंजीफ्रॉकवाला यांची बिनविरोध निवड झाली आहे, अशी माहिती निवडणूक अधिकारी ॲड. मनीष लोणारी यांनी दिली.

नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक

इतर पदासांठी दाखल झालेल्या अर्जांमध्ये प्रामुख्याने चेअरमनपदासाठी धनपाल(विनोद) शहा व महेश आव्हाड, जॉइंट सेक्रेटरी पदासाठी योगेश (मुन्ना) हिरे, चंद्रशेखर दंदणे व महेश भामरे, कार्यकारिणी सदस्य या १० पदांसाठी संदीप सेनभक्त, महेश भामरे, महेंद्र (राजू) आहेर, राघवेंद्र जोशी, हेतल पटेल, जगन्नाथ पिंपळे, शिवाजी उगले, अनिरुद्ध भांडारकर, निखिल टिपरी, विक्रांत मते, बाळासाहेब मंडलिक, नितीन धात्रक, कैलास भुतडा, झानेंद्रसिंग सिसोदिया, अनिरुद्ध चिमठाणकर यांच्यात लढत रंगणार आहे

शनिवारी मतदान

नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठीच्या निवडणुकीत मतदान प्रक्रिया शनिवार (दि.३मे) रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अन्नपूर्णा हॉल, नंदनवन लॉन्स, मते नर्सरीरोड, सावरकर नगर, गंगापूररोड, नाशिक येथे होणार आहे. असे निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. मनीष लोणारी यांनी सांगितले.

आजचे कार्यक्रम

लेखक संवाद सेतू व्याख्यान

सायं. ६.१५ वा. प. सा. नाट्यगृह वक्ते भाजप उपाध्यक्ष माधव भंडारी, विषय राम जन्मभूमीचा प्रवास

शब्दकोड२६२चे उत्तर



दैनिक देशदूत
पाहिजेत
उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दै.सार्वमत, अहिल्यानगर साठी खालील जागा त्वरित भरणे आहेत.
▶ असि. प्रिंटर / प्रिंटर
• वेब ऑफसेट मशिनवर स्वतंत्रपणे चसंगी छपाई करण्यास सक्षम.
• वृत्तपत्र क्षेत्रात किमान ५ वर्ष छपाई करण्याचा अनुभव असावा.
• प्रिंटिंग डिप्लोमाधारकांना प्राधान्य. आकर्षक पगार.
▶ वॉयलर
वृत्तपत्र क्षेत्रात वेब ऑफसेट मशिनवर काम करण्याचा किमान ०२ वर्षांचा अनुभव आवश्यक.
इच्छुकांनी आपले अर्ज दि.३१/०५/२०२५ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत.
पत्ता: कार्मिक विभाग, दैनिक देशदूत कार्यालय, एम. जी. रोड, नाशिक.
किंवा
hrd@deshdoot.com या ई मेल वरुन.